## पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
## नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक ०७/१०/२०१७ (शनिवार)
## (दुपार)

---

### जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीला अटक

**पो.स्टे. भिवापुर :-** अंतर्गत ०१ फर्लांग अंतरावर मौजा भिवापुर टि पाईंट राज्य माहामार्ग येथे दिनांक ०६/१०/२०१७ चे ०६.०० वा. ते ०६.५० दरम्यान आरोपी नामे- १) तौसिफ हफीज शेख, वय २७ वर्ष, २) शेख अरमान शेख याकुब, वय २४ वर्ष, दोन्ही रा. गिट्टीखदान नागपुर हे आपले ट्रक क. एमएच ४०/बीजी १४०६ मध्ये १० म्हैशी कि. ४ लाख रु ८ हेले कि. ७,२०,०००/- रु बिनापरवाना अवैदय रित्या कोणतीही खरेदी विक्री पावती नसतांना व वाहन चालविण्याचा परवाना नसतांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करतांना मिळुन आल्याने वाहनासह एकुण २२,२०,००० /-रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरकारतर्फे पोलीस नाईक श्री. विनोद झाडे, पो.स्टे. भिवापुर यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. भिवापुर येथे वरील आरोपीतांविरुध्द कलम ११ (ड), प्राणि निर्देयतेने वागणुक प्रतिबंधक अधिनियम, सहकलम ८३/ १७७, ३/१८१ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक श्री. विनोद झाडे हे करीत आहे.





## गैरकायदयाची मंडळी

पो.स्टे. पारशिवनी :- अंतर्गत १० कि.मी अंतरावर मौजा निंबा येथे दिनांक ०६/१०/२०१७ चे ०२.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे- विलास प्रभाकर खरे, वय २७ वर्ष, व त्यांचा भाऊ नामे- रोशन प्रभाकर खरे, वय ३० वर्ष, रा. टिमकी नागपुर, ह. मु. निंबा हे दोघेही भाऊ ढाब्यावर काम करतात व ढाब्यावर हजर असतांना **७ ते ८ अनोळखी इसमांनी तोंडाला स्कार्प बांधुन गैरकांयदयाचे मंडळी तयार करून फिर्यादीस लाठी व हातबुक्कीने तसेच फिर्यादीच्या भावास काचेच्या ग्लासने डोक्यावर मारून जखमी केले.**

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम १४३,१४७,३२४ भादंवी, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सूरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार श्री. अनिल मिश्रा हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर